# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः13.07.2025** **वारःरविवार**

---

1.विकसित भारताच्या निर्मितीत, सशक्त युवकांचा सहभाग घेण्यासाठी, सरकार कटिबद्ध असल्याचं पंतप्रधानांच प्रतिपादन

2.नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची सर्व कामं येत्या 30 सप्टेंबरपर्यंत पूर्ण केली जावीत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

3.पुणे मुंबई द्रुतगती महामार्गावर देशातला सर्वात उंच पूल, लांब-रुंद बोगदे अभियांत्रिकी क्षेत्रातले चमत्कार ठरणार

4.जागतिक वारसा स्थळांमध्ये 12 किल्ल्याचा समावेश झाल्यानं सर्वत्र आनंदाचं वातावरण आणि

5.तिसऱ्या कसोटीत भारत-इंग्लंडचे पहिले डाव बरोबरीत

**<u>रोजगार मेळावा</u>**

विकसित भारताच्या निर्मितीत, सशक्त युवकांचा सहभाग घेण्यासाठी, सरकार कटिबद्ध असून भारताकडे असलेल्या तरूणाची लोकसंख्या आणि लोकशाहीची साक्ष जगाला पटली असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. सोळाव्या देशव्यापी रोजगार मेळाव्यात ते काल दूरस्थ पद्धतीनं युवकांना संबोधित करताना बोलत होते. विविध सरकारी विभागातल्या सेवांसाठी 51 हजार जणांना ठिकठिकाणी काल नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आली. त्यामध्ये सर्वाधिक ४१ हजार नियुक्तीपत्रं रेल्वे खात्यात देण्यात आली आहेत. यामध्ये महिला, दिव्यांग आणि दुर्गम भागातील उमेदवारांना विशेष प्राधान्य देण्यात आलं आहे.

पंतप्रधान म्हणाले की, नवनियुक्त युवकांची राष्ट्र निर्मितीत महत्वपूर्ण भूमिका असून कायम नियुक्ती मिळालेल्या पदाच्या माध्यमातून त्यांनी राष्ट्र आणि जनसेवा करावी...

**(मोदी बाईट – 58 सेकंद)**

महाराष्ट्रात नागपूर इथं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुंबईत केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, तर पुण्यात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत प्रातिनिधिक नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात आलं.

सरकार रोजगार निर्मितीच्या क्षेत्रात केवळ आश्वासनांपुरते मर्यादित नसून प्रत्यक्षात कृतीच्या माध्यमातून परिवर्तन घडवत असल्याचं प्रतिपादन नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यात रोजगार मेळाव्याच्या कार्यक्रमात केले.

अशा रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून युवकांना अधिक सक्षम आणि आत्मनिर्भर होण्याची दिशा मिळते. हा उपक्रम म्हणजे युवाशक्तीला सक्षम करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं मोहोळ यांनी सांगितलं.

पुण्यात आयोजित कार्यक्रमात २०० जणांना नियुक्तीपत्र देण्यात आली यावेळी राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी, रेल्वेचे पुणे विभागाचे व्यवस्थापक राजेशकुमार वर्मा उपस्थित होते. टपाल खाते, रेल्वे, सीआयएसएफ, बँकासहीत विविध केंद्र सरकारी कार्यालयांत सेवेसाठी ही नियुक्तीपत्रं देण्यात आली.

मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथं कार्यक्रमात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत रोजगार मेळावा झाला. यावेळी राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा आणि मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पूर्वी रेल्वेमध्ये त्रुटीमुळे नियुक्त्या होत असत, परंतु आता कोणतीही नोकरी प्रक्रियेतूनच मिळते आणि गुणवत्ता हाच निकष असल्याचं पीयूष गोयल यांनी सांगितलं.

**बाईट मोहोळ**

**इंट्रो-**

अहमदाबाद विमान दुर्घटनेबाबत, प्राथमिक अहवाल प्राप्त झाला असून सखोल चौकशी करून अंतिम अहवाल प्राप्त होणार आहे, तोपर्यंत कोणतेही निष्कर्ष काढू नका असं केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यात रोजगार मेळाव्याच्या कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितल.

प्राथिमिक अहवाल एक महिन्यात मिळाला असून सर्व प्रक्रिया पुर्ण  वेगाने सुरू असल्याचं सांगून ते म्हणाले की, पूर्वी ब्लॅक बॉक्स बाहेरच्या देशात पाठवले जायचे, मात्र आता देश आत्मनिर्भर असल्याने ब्लॅक बॉक्सची प्रक्रिया आणि तपासणीचे काम आपल्या देशातच होत आहे.

**<u>ते म्हणाले ......</u>**

**<u>(बाईट – मोहोळ 30 सेकंद)</u>**

**<u>नवी मुंबई विमानतळ</u>**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची सर्व कामं येत्या 30 सप्टेंबरपर्यंत पूर्ण केली जावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिडको आणि अदानी कंपनीला दिले आहेत. रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात विकसित होत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या कामाची पाहणी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

नवी मुंबई विमानतळ हा देशातील सर्वात अद्ययावत प्रकल्प ठरणार असून त्याचं काम आता अंतिम टप्प्यात आलं आहे. व्यवसायिक उड्डाणांसाठी सर्व कामं पूर्ण झाल्यानंतर काही परवानगी घ्याव्या लागतात, त्याचंही काम समांतर पातळीवर सुरू करण्यासाठी सांगण्यात असल्याची माहिती फडणवीस यांनी यावेळी दिली.

विमानतळाचं भौतिक काम 94 टक्के पूर्ण झालं असून या विमानतळावर दोन धावपट्ट्या असणार आहेत, तसंच जलमार्ग, रस्तेमार्ग, मेट्रो मार्गानं हा विमानतळ जोडण्यात येणार आहे.

**<u>विमान वाहतूक</u>**

विमान वाहतूक क्षेत्राच्या विकासामार्फतच भारत जगातली तिसरी सगळ्यात मोठी अर्थव्यवस्था होईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापु राम मोहन नायडू यांच्या प्रमुख उपस्थितीत काल मुंबईत झालेल्या पश्चिम प्रादेशिक नागरी विमान वाहतूक परिषदेत ते बोलत होते.

पूर्वी केंद्र सरकारची जबाबदारी म्हणून पाहिलं जाणारं हे क्षेत्र आता राज्यांच्या विकासाच्या केंद्रस्थानी आलं असून महाराष्ट्रात सध्या 36 पैकी 24 जिल्ह्यांत विमानतळ आहेत. ही संख्या 30 पर्यंत नेण्याचं लक्ष्य निश्चित ठेवण्यात आलं असल्याचं यावेळी फडणवीस म्हणाले.

**<u>मिसिंग लिंक</u>**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्प अभियांत्रिकी क्षेत्रातील चमत्कार असेल, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रकल्पाच्या कामाची पाहणी केल्यावर व्यक्त केलं आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते.

या प्रकल्पामुळं पुणे-मुंबई प्रवासाचा वेळ, अंतर कमी होईल, घाट असलेला भाग टाळता येईल आणि वाहतुक अडथळाही दूर होणार आहे.

मिसिंग लिंक प्रकल्पांतर्गत तीन बोगदे असून एक बोगदा ९ किलोमीटर लांब आणि २३ मीटर रुंदीचा असून देशातल्या सर्वात जास्त लांबीचा बोगदा ठरणार आहे.

प्रकल्पांतर्गत अतिशय उंच पूल बांधण्यात येत असून हा देखील एक विक्रम होणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**जागतिक वारसा**

छत्रपती शिवाजी महाराज यांचं शौर्य आणि पराक्रमाची साक्ष देणारे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आले असून महाराष्ट्रातील रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी तर तमिळनाडूतील जिंजी किल्ला यांचा समावेश आहे.

या ऐतिहासिक क्षणाचं औचित्य साधून रायगड किल्ल्यावर काल जिल्हा प्रशासनाच्या वतीनं छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आलं. राजसदरपासून लेझीम पथक आणि पोलीस पथकानं पारंपरिक वाद्यांच्या गजरात होळीचा माळ येथे जाऊन महाराजांना पुष्पहार अर्पण केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळी जाऊन अभिवादन करत पोलीस मानवंदना दिली. तसंच गडावर विविध ठिकाणी आकर्षक रांगोळ्यांनी सजावट करण्यात आली होती.

आता पन्हाळा आणि कोल्हापूरकरांची जबाबदारी वाढली असल्याचं कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी सांगितलं.

जागतिक वारसा स्थळांमध्ये सातारा जिल्ह्यातील प्रतापगड किल्ल्याचा समावेश झाल्यानं सर्वत्र आनंदाचं वातावरण आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराज यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळेत

परिपाठाच्या वेळी जागतिक वारसा स्थळ म्हणून प्रतापगड किल्ल्याचा समावेश होत असतानाचं चित्रीकरण विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. सर्व शाळांमध्ये आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

रत्नागिरी तालुक्यातल्या नाचणे गावातल्या जिल्हा परिषद शाळेत मुलांनीही आनंदोत्सव साजरा केला.

**<u>सेवा समाप्ती कारवाई</u>**

पालघर जिल्ह्यातल्या डहाणू तालुक्या मधल्या आरोग्य तपासणी शिबिरातील अनुपस्थित राहिल्यामुळे भरारी पथकातले डॉक्टर, डॉक्टर कृणाल सोनावणे यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. चौकशी अहवालात सेवा कसूर स्पष्ट झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या मान्यतेने जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी ही सेवा समाप्तीची कारवाई केली आहे.

**<u>क्रिकेट</u>**

अँडरसन-तेंडुलकर मालिकेतील तिसऱ्या कसोटी सामन्यात काल तिसऱ्या दिवसअखेर भारताचाही पहिला डाव इंग्लंडप्रमाणे 387 धावांवरच संपला त्यामुळं यजमान इंग्लंड आता दुसऱ्या डावात किती धावा करणार ते औत्सुक्याचं ठरेल. चौथ्या दिवशी ते नाबाद 2 धावांवर आपला डाव पुढे सुरु करतील. भारताच्या पहिल्या डावात के एल राहुलचं शतक आणि रिषभ पंत आणि रविंद्र जडेजाच्या अनुक्रमे 74 आणि 72 धावा महत्वाच्या ठरल्या. या मालिकेत भारतीय फलंदाजांनी आतापर्यंत 36 षटकार मारुन वेस्टइंडिजचा यापूर्वीचा विक्रम मागे टाकला आहे.

**<u>हवामान</u>**

मध्य महाराष्ट्राच्या घाटमाथ्यांवर, दक्षिण कोकण आणि विदर्भात वीजा आणि जोराच्या वाऱ्यासह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**